# UMED MAHARASHTRA STATE RURAL LIVELIHOODS MISSION
# उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
## जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, अमरावती

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष
जिल्हा परिषद, कॅम्प रोड,
अमरावती - ४४४६०३
ईमेल- : amravati@umed.in

District Mission Management Unit
Zilha Parishad, Camp Road
Amravati – 444603
Email : amravati@umed.in

पत्र क्र./जिपअ/मराग्राजीअ/संपा./वशी- १०३/२०२३-२४ दिनांक :- ३१/०१/२०२४

**दरपत्रक**

**प्रती,**

**..................................................**

**..................................................**

**..................................................**

**विषय:- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत क्षेत्रीय भेटी करिता वाहन भाडेतत्वावर घेण्याकरिता सेवा पुरवठा धारकांकडून दरपत्रक उपलब्ध करून घेण्याबाबत..**

**संदर्भ:- १) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, म.रा.ग्रा.जी.अ., नवी मुंबई यांचे कार्यालीन परिपत्रक क्र. एमएसआरएलएम/एचआर/३६/जा.क्र. ५१६/२०१४ दिनांक १४ मार्च २०१४.**

**२) शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग.III उद्योग -४ दिनांक ०१/१२/२०१६.**

**३)शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०२१/प्र.क्र.८ दिनांक ०७/०५/२०२१.**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापक व जिल्हा व्यवस्थापक यांना क्षेत्रीय कार्य करिता वाहनाची आवश्यकता असल्याने जिल्हास्तरावर मासिक भाडेतत्वावर एक वाहन भाडेतत्वावर घेण्यास सेवा पुरवठा धारकांकडून खुल्या बाजारातून दरपत्रक **GST** सह मागविण्यात येत आहे.

करीता आपण वाहन भाडेतत्वावर देण्यास तयार असल्यास दराची सीलबंद दरपत्रक या कार्यालयास दिनांक ०७/०२/२०२४ ला दुपारी ०३.०० वाजेपर्यंत सादर करावेत. सदर प्राप्त सीलबंद/पाकीटबंद दरपत्रक त्याच दिवशी मा. प्रकल्प संचालक तथा जिल्हा अभियान सहसंचालक जि.ग्रा. वि. य. अमरावती यांचे कक्षात साय. ०५ वाजता उघडण्यात येईल. प्राप्त दर यांचे तुलनात्मक तक्ता तयार करून प्राप्त सर्वात कमी दराचे दरपत्रक मंजूर करण्यात येईल. दरपत्रकामध्ये साहित्याचे दर अपूर्ण असल्यास व दरामध्ये खोडतोड असल्यास सदरची दरपत्रक **GST** सह नसल्यास दर ग्राह्य धरल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**वाहन भाडेतत्वावर घेण्याकरिता आवश्यक वाहनांचा तपशील खालीलप्रमाणे**

**इ. ) मासिक भाडे तत्वानुसार (Monthly Basis)**

| वाहनाचा प्रकार | वातानुकुलीत /विना वातानुकूलित | आवश्यक संख्या |
|---|---|---|
| TUV/बोलेरो/ किंवा समकक्ष (7 आसनी) | **विना वातानुकूलित** | दरमहा ०१ वाहन |

**मासिक भाडे तत्वा नुसार (Monthly Basis) (इंधन व वाहनचालक सह)**

1. प्रती महिना 2000 कि.मी. पर्यंत (Minimum running 2000 KM)
2. 2000 कि.मी च्या वर होणारा प्रवासाचा प्रती किमी दर (Rate / KM over and above 2000 KM)

**विशेष सूचना** – मुक्काम झाल्यास त्याकरिता कोणताही अतिरिक्त भत्ता (Halting Charges) दिला जाणार नाही. तसेच वाहन चालकाची राहण्याची /निवासाची/भोजनाची व्यवस्था या कार्यालयाकडून केली जाणार नाही.

**अ .तांत्रिक लिफाफा:-**

**इच्छुक दरपत्रक धारकांनी खालील तांत्रिक कागदपत्रे सादर केली जाणे आवश्यक आहे.**

**छ)** एकल स्वामित्व फर्म (Proprietary Firm)/भागीदारी फर्म(Partnership Firm)/मर्यादित कंपनी (Limited Company)/कायद्याद्वारे स्थापित निर्गमित संस्था (Corporate Body Legally Constituted) असल्याचे नोंदणी प्रमाणपत्र.

**ज)** दरपत्रक धारकांनी प्रवासी परवाना वाहने शासकीय/निमशासकीय कार्यालयास/खाजगी संस्थाना भाड्याने पुरविण्याचा किमान ३ वर्ष अनुभव असल्याबाबत संबंधित विभागाचे अनुभव प्रमाणपत्र किवा पुरवठा आदेश प्रत/कराराची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

**झ)** दरपत्रक धारकाकडे PAN कार्ड ची सत्यप्रत सोबत जोडावी.

**ञ)** GST नोंदणी प्रमाणपत्र ची सत्यप्रत सोबत जोडावी.

**ट)** सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाऊंट) यांचे तीन वित्तीय वर्ष २०२०-२१,२०२१-२२ व २०२२-२३ चे १० लाख रुपये (Trunover Certificate) आर्थिक उलाढालीचे प्रमाणपत्र.

**ठ)** प्रवासी परवाना असलेल्या मासिक भाडेतत्वावर घेण्यात येणाऱ्या एका वाहनाचे त्या फर्मच्या नावाने असलेले संपूर्ण वैध दस्ताऐवज खालील प्रमाणे सोबत जोडावे.

१) वाहनाची RC बुकची प्रत. (जाने.२०२१ नंतरचे मॉडेल असणे आवश्यक)

२) वाहनाचा अद्ययावत विमा भरल्याची प्रत.

३) Tourist Permit नोंदणी प्रमाणपत्र.

**ब) आर्थिक लिफाफा:-**

१)फॉर्म-१ नुसार आर्थिक लिफाफा.

२ (या निविदा दस्तऐवजाच्या फॉर्म–१ प्रमाणे वित्तीय लखोट्यात या निविदा दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे तपशील आणि अटी व नियमाच्या अधिन राहून दर नमूद करणे आवश्यक आहे .

३)स्वीकारलेले दर निश्चित कालावधीसाठी दरपत्रक धारकास बंधनकारक असतील आणि कोणत्याही कारणाने करार कालावधी पूर्ण होईपर्यंत त्यात बदल केला जाणार नाही.

**७) दरपत्रक उघडणे आणि मूल्यांकन प्रक्रिया**

दरपत्रक अधिसूचनात नमूद केलेल्या दिनांक व वेळेला नमूद पद्धती नुसार तांत्रिक व व्यवसायिक दरपत्रक उघडल्या जातील.

**८) निवड निकष-:**

दरपत्रक जारीकर्ता सर्व बाबी एकत्रित न्युनतम दर/ बाब निहाय न्युनतम दर रक्कमेच्या(एल-१ दरपत्रकधारक )निवड करेल. दरपत्रक जारीकर्ता हे एकापेक्षा अधिक सेवा पुरवठादार निवडीचा अधिकार स्वतः कडे राखून ठेवत आहे. जर कराराच्या कालावधीत कोणत्याही वेळी दरपत्रक सेवा साठीची किंमत केंद्रीय किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही कायद्याच्या किंवा अधिनियमाव्दारे कमी केली गेली असेल तर दरपत्रक धारकाला नैतिक आणि वैधानिकदृष्ट्या करार केलेल्या किमती कमी होण्याबाबतची माहिती ताबडतोब दरपत्रक जारीकर्ता / खरेदीदाराला सांगणे बंधनकारक असेल. त्यानुसार दर कमी करण्याचा अधिकार असेल.

**९) दरपत्रक स्वीकारण्याचा किवा सर्व दरपत्रक नाकारण्याचा अधिकार-:**

दरपत्रक स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार आणि करार करण्याआधी दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याच्या आणि कोणत्याही वेळी कोणतीही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार कोणत्याही दायित्वाविना दरपत्रक जारीकर्ता कडे राखून ठेवला आहे.

**१०)दंड -:**

नमूद केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करण्यासाठी (Scope of Work )दरपत्रक धारक अयशस्वी ठरल्यास प्रती प्रसंग प्रती दिवस रुपये १००/- दंड आकारण्यात येईल.

**११) अनामत रक्कम :-**

यशस्वी दरपत्रक धारक यांचे कडून दरपत्रकाच्या एकूण रकमेच्या ०३ % इतकी अनामत रक्कम (सुरक्षा ठेव) बँक गॅरंटीद्वारे कार्यालयाकडे जमा करावी लागेल व करार संपुष्टात आल्यानंतर पुरवठादाराच्या मागणीनुसार विहित शासन पद्धतीने सदर अनामत रक्कम परत करण्यात येईल.

**१२) देयक अदा करण्याबाबत अटी-:**

निर्धारित केलेल्या अधिकारी यांनी योग्यरित्या प्रमाणित करून स्वाक्षरी केलेल्या logbook प्रतिसह देयक (Tax Invoice, Pan Card, GSTIN, Bank Details) सादर केल्या नंतर देय रक्कम सर्व करवजावटीसह अदा केली जाईल. तसेच शासन स्तरावरील निधी उपलब्धते नुसार देयक अदा करण्यात येतील.

१३) **इतर अटी व शर्ती** :-

**१) सेवा पुरवठादार यांनी दरपत्रक सादर करीत असतांना तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा असे वेगवेगळे दोन लिफाफे एक मुख्य लिफाफा मध्ये सादर करावे.**

२) या कार्यालय मार्फत कोणत्याही स्तरावर पुर्वसुचना न देता दरकरार रद्द करण्याचा किंवा कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार प्रकल्प संचालक जि.ग्रा.वी.अ. तथा जिल्हा अभियान सहसंचालक, म.रा.ग्रा.जी.अ., अमरावती यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

३) कंत्राटदार या कार्यालयास वाहनाच्या सेवेबाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार या कार्यालयाकडे येणार नाही, तसे झाल्यास हे कार्यालय कोणत्याही स्तरावर सेवा रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.

४) तसे उद्भवल्यास अटी व शर्तीनुसार दंडात्मक रक्कम वसुल करून आपणाला शासनाच्या काळया यादीत समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

५) प्रथम दरपत्रक उघडण्याच्या वेळी ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास अल्प प्रतिसादामुळे दरपत्रकास पुन्हा मुदतवाढ देण्यात येईल अथवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येईल. या बाबतीतील सर्व अधिकार प्रकल्प संचालक जि.ग्रा.वी.अ. तथा जिल्हा अभियान सहसंचालक, म.रा.ग्रा.जी.अ., अमरावती यांना राहील.

६) दरपत्रक धारकाने अटी व शर्तीचे पालन केले नाही तर या कार्यालयाकडे जमा असलेली संपूर्ण रक्कम म्हणजे अनामत रक्कम (सुरक्षा ठेव रक्कम) व इतर देय असलेली रक्कम या कार्यालयामार्फत जप्त करण्यात येईल.

७) महिन्यातील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी संपुर्ण वेळ वाहन उपलब्ध असणे आवश्यक आहे. रविवारी व राजपत्रित सुट्टीच्या दिवशी देखील वाहने क्षेत्रभेटी करिता उपलब्ध करून द्यावी लागतील. मासिक भाडे तत्वाच्या प्रकारामध्ये रविवार व इतर सुट्ट्याचा समावेश नसेल. सदर वाहन त्या महिन्यातील दिवसानुसार पुर्ण दिवस उपलब्ध करून द्यावे लागेल.

८) जरी या कराराचा कालावधी ११ महिन्याचा असला तरी कार्यालयाच्या आवश्यकते प्रमाणे आपली सेवा व दिलेल्या अटी शर्तीच्या अधीन राहून द्विपक्षीय सक्षम प्रधिकार्याचे मान्यतेने कमी अथवा जास्त करता येईल.

९) सेवा पुरवठा करण्यात येणारी प्रवासी वाहतूक परवाना जानेवारी २०२१ नंतर परिवहन खात्याकडे नोंदणीकृत असलेली चालू व तांत्रिक दृष्ट्या उत्तम स्थितीत असलेले वाहने पुरविणे बंधनकारक आहे. त्याबाबत RTO यांनी प्रमाणित केलेले असले पाहिजे. करार कालावधीत वाहनांची अंतर्गत व बाह्य स्वच्छता ठेवणे, पुरविण्यात आलेले वाहन अचानक बंद पडल्यास त्वरित समकक्ष वाहन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सेवा पुरवठा धारकाची राहील.

१०) कार्यालयाकडून मागणी केले नंतर दरपत्रक धारकाने नियोजित ठिकाणी वेळेवर वाहन उपलब्ध न करून दिल्यास, कार्यालय खुल्या बाजारातून इतर सेवा पुरवठादारा कडून वाहन उपलब्ध करून घेईल व त्याकरिता येणारा खर्च सेवा पुरवठा धारकाकडून वसूल करण्यात येईल.

११) वाहने तांत्रिक दृष्ट्या व उत्तम स्थितीत चालण्याकरिता येणारा सर्व खर्च (जसे कि, इंधन (Disel/ Petrol), वाहन दुरूस्ती, व त्याकरिता आवश्यक सुट्टे भाग,/Spare parts, वाहन चालकाचा पगार, व इतर आवश्यक खर्च ) हे सेवा पुरवठा

धारकाला स्वत: करणे बंधनकारक राहील.

१२)वाहन चालकांचे मानधन/मजुरी कंत्राटदाराणेच अदा करावी. कामगार कायद्यानुसार सर्व अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१३)टोल नाका वरील कर हे वाहन मालकास प्रथम भरून त्यांचे देयक देयकासोबत सदर करावे.

१४)प्रवासादरम्यान मुक्कामासाठी अतिरिक्त शुल्क दिले जाणार नाही.

१५)निविदेमधील अटी व शर्तीमध्ये तसेच तपशीलमध्ये आराखड्यामध्ये फेरबदल करण्याचा अधिकार प्रकल्प संचालक जि.ग्रा.वी.अ. तथा जिल्हा अभियान सहसंचालक, म.रा.ग्रा.जी.अ., अमरावती यांना राहील.

१६)मंजूर दरपत्रक धारक यांचे वाहन भाडेतत्वावर लावणे बंधनकारक राहील. त्यामुळे इतर फर्मच्या वाहन भाडेतत्वावर लावता येणार नाही. कारण सदर फार्म स्पर्धा न करता आलेला असेल.

१७)व्यावसायिक वाहने चालविण्याकरिता आवश्यक परवाने, वाहनचालकाचा परवाना, लागू असलेल्या करांचा भरणा केलेल्या पावत्या, उतरविण्यात आलेल्या विम्याची कागदपत्रे, वाहनामध्ये उपलब्ध असली पाहिजेत. तसेच वाहनावर On Government Duty असे नोंदविणे गरजेचे आहे.

१८)अपवादात्मक परिस्थितीमध्ये वाहनामध्ये अथवा वाहनचालक बदलावयाचा असल्यास, त्याकरिता प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.य. अमरावती यांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१९)वाहनचालकास अमरावती जिल्ह्यातील गावाची, रस्त्याची इत्यंभूत माहिती असणे आवश्यक आहे. त्याचाकडे वाहन चालाविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक आहे. वाहनचालकास विहित केलेली वर्दी (Uniform) परिधान करणे, स्थानिक भाषेवर प्रभुत्व असणे, वाहनचालक सभ्य शालीन व चांगल्या वर्तणुकीचा असावा, वाहनचालक निर्व्यसनी असावा तसेच त्यांच्याकडे मोबाईल फोन असणे बंधनकारक राहील. वाहनचालकाने गैरवर्तणूक केल्यास त्याचे विरुद्ध व सेवा पुरवठा धारका विरुद्ध कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.य. अमरावती यांना राहील.

२०) वाहनाची एकूण धाव (mileage) निश्चित करताना व देयक (Bill) बनविताना, कार्यालयीन निर्देशानुसार सुचविलेल्या ठिकाण व वेळच ग्राह्य धरली जाईल. कोणत्याही परिस्थितीमध्ये कार्यालयीन निर्देश व्यतिरिक्तच्या धावेचे देयक अदा केले जाणार नाही. वाहन चालकाने वेळोवेळी धावसंख्या (K.M.) लॉगबूक मध्ये नोंदविणे व लॉगबूक अद्ययावत ठेवनेकारिता जबाबदार राहील.

२१) अपघाताने होणा-या वाहनाच्या नुकसानीस तसेच अपघातामुळे होणा-या इतर वाहनाच्या नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाहीत.वाहनाचा Ccomprehensive insurance उतरविणे बंधनकारक आहे. (गाडीमध्ये बसलेले अधिकारी/कर्मचारी यांचे सह)

२२) निवड झालेल्या सेवा पुरवठादाराने करारातील अटी व शर्तीच्या अधीन राहून करार कालावधीत वाहनांची जसे व ज्यावेळी मागणी करतील त्यावेळी पुरवठा करावयाचा आहे. तसेच आवश्यकतेनुसार वातानुकुलीत (AC) सुविधा देणे बंधनकारक राहील. मागणी नुसार वेळेच्या आत वाहने उपलब्ध न करुन देणे, करार कालावधीच्या वेळेपूर्वी वाहनाचा पुरवठा व इतर सेवा बंद करणे, करारातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग करणे याबाबत होणारी नुकसान भरपाई संबधित पुरवठा धारकाकडून वसुल करण्यात येईल व सदरची सेवा रद्द करण्यात येईल.

२३)पुरविण्यात आलेले वाहन चालक हे निवड केलेल्या सेवा पुरवठा धारकाचे कर्मचारी असतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी सेवा पुरवठा धारकाची राहील.

२४) निवडण्यात आलेल्या सेवा पुरवठाधारकास वैधानिक बाबीची पूर्तता करावी लागेल.

२५) शासकीय सर्व नियमांचे /कायद्याचे पालन करणे बंधनकारक आहे .

२६) पुरवठादाराच्या देयकातुन नियमानुसार विहित कर कपात करण्यात येईल.

२७) स्थानिक प्रशासन यांनी दिलेल्या सूचनाचे पालन करावे लागेल.

२८) कोणत्याही कारणास्तव कोणत्याही परिस्थीतीत आगाऊ/अग्रिम रक्कम दिले जाणार नाही.

२९) निवड करण्यात आलेल्या सेवा पुरवठा धारकाने सादर केलेले दर हे ११ महिन्याच्या करार कालावधी करीता आहेत. इंधन व सुट्टे भाग यांच्या किंमती वाढ झाली तरी कोणत्याही परिस्थितीमध्ये निश्चित केलेल्या दरामध्ये वाढ होणार नाही.

३०) प्रत्येक वाहनासाठी स्वतंत्र logbook ठेवून ते त्यावर वेळोवेळी झालेल्या धावांची नोंद घेण्याची व अद्यावत ठेवण्याची जबाबदारी सेवा पुरवठा धारकाकडील वाहनचालकयांची असून त्यावर सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी घेऊन देयकासोबत सादर करावी.

३१)संबधीत कामाकरिता उप कंत्राटदार (Sub Contractor) नेमता येणार नाही.

३२) या कार्यालयाकडून नाम निर्देशित केलेल्या अधिका-याकडून सेवा पुरवठा धारकास वाहन पुरविण्याबाबत सूचना देण्यात येतील व त्यानुसार वेळेवर वाहन पुरवण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील.

३३)तातडीच्या व अपवादात्मक परिस्थितीमध्ये कमी कालावधीच्या सूचनेवर देखील सेवा पुरवठा धारकास वाहने पुरवावी लागतील.

३४)यशस्वी सेवा पुरवठा धारकास व्यावसयिक वाहने वापरणे / चालविणे बाबत केंद्र व राज्य शासनाच्या वाहतुक परिवहन विभागाचे सर्व कायदे व नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

३५) सेवा पुरवठा धाराकाच्या निष्काळजीपणामुळे केंद्र व राज्य सरकारच्या कायद्याचा / नियमाचा भंग झाल्यामुळे होणा-या नुकसानीस सेवा पुरवठा धारक जबाबदार असेल.

३६)आदेश दिल्यानंतर तात्काळ वाहन उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

३७)सेवापुरवठादाराने रु.१००/- च्या बॉडपेपर वर सर्व अटी व शर्ती मान्य असल्यासबाबत चा करारनामा या कार्यालयासोबत सादर करणे आवश्यक राहील.

३८)वाहनास अपघात झाल्यास होणाऱ्या सर्व नुकसाणासाठी तसेच शासनाच्या संबंधित कायद्यान्वये होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीसाठी कंत्राटदार जबाबदार राहील.

**३९)वाहन भाडेतत्वावर घेनेकारिता तुलनात्मक दृष्ट्या कमी दर नमूद केलेल्या सेवा पुरवठादारास सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेनंतर प्रतीमाह किमान २००० किमी पर्यंतचे दर संबंधित वाहन योग्य व्यवस्थितपणे १ पूर्ण महिना सेवा प्रदान करीत असेल तरच नमूद दरानुसार देयक अदा होणे अपेक्षित आहे. कोणत्याही अपरिहार्य कारणास्तव किंवा वाहनाची सेवा व्यवस्थित नसल्यास व उपस्थित झालेल्या तक्रारीमुळे वाहनाचा महिना पूर्ण न होता अपूर्ण कालावधीत बंद करण्यात आले असता त्यास संपूर्ण महिन्याचे ठरविण्यात आलेले दर देय न ठरता वापरात असलेल्या महिन्याचे समप्रमाणात असलेले दिवस किंवा २००० किमी कमाल मर्यादेत अनुसरून प्राप्त झालेले कि.मी. यापैकी परीगणित करून देय राहील या करिताच्या स्पष्ट सूचना कार्यारंभ आदेशात नमूद करण्यात येतील. याची नोंद घेण्यात यावी.**

४०)वरील सर्व अटी व शर्ती पैकी कोणतीही अट अथवा निर्णय बदल करण्याचे अधिकार प्रकल्प संचालक जि.ग्रा.वी.अ. तथा जिल्हा अभियान सहसंचालक, म.रा.ग्रा.जी.अ., अमरावती यांनी राखून ठेवण्यात आले आहेत.

**--स्वाक्षरी---**
**(प्रिती देशमुख)**
**प्रकल्प संचालक,**
**जि.ग्रा.वि.यं., अमरावती**
**तथा जिल्हा अभियान सहसंचालक**
**म.रा.ग्रा.जी.अ.अमरावती**

**(टीप - मूळ दरपत्रक नमुना मा. प्रकल्प संचालक जि.ग्रा.वी.अ. तथा जिल्हा अभियान सहसंचालक, म.रा.ग्रा.जी.अ., अमरावती यांचे स्वाक्षरीने मंजूर)**

**फॉर्म-१**

**( Financial bid format Form-1)**

**व्यावसायिक (आर्थिक)दरपत्रक चे प्रपत्र**

**( सेवा पुरवठा धारकाच्या लेटर हेड वर सादर करावा. )**

**दिनांक:-**

**प्रति,**

**मा. जिल्हा अभियान सहसंचालक,**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवोनान्नती अभियान तथा**
**प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वी.यं., अमरावती.**

**विषय:- जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष अमरावती करिता एक वर्षाकरिता मासिक तत्वावर (Monthaly Basis) भाड्याने वाहने पुरविण्यासाठी दर सादर करणे बाबत.**

**संदर्भ :- आपले दरपत्रक जिपअ/मराग्राजीअ/संपा/वशी- १०३/२०२३-२४, दि. ३१.०१.२०२३.**

**मा. महोदय,**

आपल्या आवश्यकतेनुसार, आम्हाला आमचे सर्वात वाजवी आणि स्पर्धात्मक दर सादर करण्यास आनंद होत आहे.

| वाहनाचा प्रकार | अटी | एकक | प्रती महिना नग | मासिक दर |
|---|---|---|---|---|
| **मासिक भाडे तत्वा नुसार (Monthly Basis)** | | | | |
| **TUV/बोलेरो/ किंवा समकक्ष (7 आसनी) (विनावातानुकूलित)** | कमीत कमी २००० कि.मी. | मासिक वाहन दर | १ वाहन | |
| | २००० कि.मी.च्या वर प्रती कि.मी.दर | कि.मी. | १ कि.मी. | |

*** टीप –आर्थिक मुल्यांकन करतानी मासिक भाडे तत्वा नुसार (Monthly Basis) दरपत्रक धारक सर्वात कमी दर सादर करेल तो L १ ठरेल.**

आम्ही दरपत्रक दस्तऐवजामध्ये नमूद केलेल्या अटी व नियमांनुसार उपरोक्त दरामध्ये सेवा प्रदान करण्यास तयार आहे. आम्ही याव्दारे प्रमाणित करतो की, आम्ही आपले कार्याल्याकरिता कार्य करणाऱ्या किंवा आमच्या वतीने कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने सदरील कामाकरिता पैशाची मागणी किंवा प्रतिस्पर्ध्याशी संगनमत करून दर सादर केलेले नाही. याची खात्री करीत आहोत.

**निविदाधारकाची स्वाक्षरी**

**नाव: ____________________**

**कार्यालयीन हुद्दा**

**शिक्का**